HGH INDIA® 2022
HOME DECOR ▪▪▪ GIFTS ▪▪▪ HOUSEWARE
December 13-16, 2022
Bombay Exhibition Center, Mumbai

NEWS 3

A TEXZONE Event
www.hghindia.com

Where business feels at home!

# एचजीएच इंडिया
# वसंत 2023 ची दमदार सुरुवात

होम टेक्सटाईल, होम डेकोर, होम फर्निचर, हाऊसवेअर आणि भेटवस्तूकरिता ही भारतामधील अग्रगण्य B2B व्यापारी कार्यक्रम HGH India करिता पहिली वसंत आवत्ती आहे, जिला गृहोपयोगी उत्पादन उद्योग क्षेत्रेचे बळकट साह्य आहे. सुमारे दोन वर्षाहून अधिक काळ गोरेगाव येथील बॉम्बे इंटरनॅशनल एक्झिबिशन सेंटरमध्ये कोविड रुग्णालयाचा डेरा होता. आता त्याचठिकाणी होम टेक्सटाईल, होम डेकोर, होम फर्निचर, हाऊसवेअर आणि भेटवस्तूकरिता ही भारतामधील अग्रगण्य B2B व्यापारी कार्यक्रम HGH India करिता पहिली वसंत आवृत्ती परतली आहे. दिवाळीच्या अतिशय यशस्वी विक्री मोसमानंतर मोठी संधी विकसीत करण्याच्या उद्देशाने हा व्यापारी कार्यक्रम सज्ज झाला. वसंत 2023 ग्राहक मागणीच्या उद्देशाने विक्रेते आणि वितरकांना उत्पादन साठा पुन्हा तयार ठेवावा लागणार असल्याचा विचार त्यांनी मांडला. शिवाय, आधुनिक ग्राहक महत्त्वाकांक्षा लक्षात घेऊन त्याद्दष्टीने तयारी म्हणून त्यांनी नवीन कल्पना, उत्पादने आणि सेवा निर्मितीची आवश्यकता बोलून दाखवली. HGH India चे व्यवस्थापकीय संचालक, अरुण रुंगटा म्हणाले:



“आम्ही HGH India वसंत आवृत्तीची निर्मिती केली आहे, जेणेकरून आमच्या गृहोत्पादन उद्योगांविषयी दिवाळीच्या काळात व्यवसायाच्या संधी वाढतील. उत्पादन आणि आरेखन (डिझाईन) नवकल्पना वारंवार निर्माण झाल्याने स्पर्धा तीव्र होत आहेत, अधिकाधिक किरकोळ विक्रेते आणि वितरक त्यांच्या पूर्वीच्या वार्षिक चक्राऐवजी अर्ध-वार्षिक स्रोत चक्राच्या दिशेने जात आहेत. होम टेक्सटाइल्स, होम डेकोर, हाऊसवेअर आणि भेटवस्तूंच्या मागणीतील मजबूत वाढीचे पालन करण्यासाठी, वितरक आणि किरकोळ विक्रेत्यांना त्यांच्या मूल्य साखळीला गती देणे आणि ग्राहकांना अंतीम टप्प्यापर्यंत गतिशीलतेचा लाभ घेण्यासाठी अतिरिक्त संधीची आवश्यकता आहे. »



*प्रमुख पाहुणे अलेसॅन्ड्रो लिबेरॅटोरी आणि मान्यवर अतिथी अतुल शहा अन्य नामाकितांसमवेत HGH India कार्यक्रमात दीपप्रज्वलन आणि उद्घाटन करताना*

या उदंड प्रतिसादाच्या व्यापारी कार्यक्रमाचे उद्घाटन पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वल करून करण्यात आले, यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ट्रेड कमिशनर अँड डायरेक्टर ऑफ द इटालियन ट्रेड एजन्सीचे डॉ. अलेसॅन्ड्रो लिबेरॅटोरी, बीजेपी महाराष्ट्रचे प्रवक्ता आणि मान्यवर अतिथी अतुल शहा, श्री अरुण रुंगटा आणि डॉ. ग्रीट बोएट्रेगर, HGH India चे संचालक त्याचप्रमाणे उद्योग क्षेत्रातील अनेक दिग्गज, सरकारी अधिकारी आणि अन्य पाहुणे उपस्थितांची विशेष उपस्थिती लाभली. डॉ. बोएट्रेगर यांनी सर्वांसमवेत दीपप्रज्वलन केल्यानंतर पुन्हा एकदा खरेदीदार आणि प्रदर्शनाला भेट देणाऱ्याना आकर्षित करण्याकरिता त्यांच्या सोयीने दर्जेदार आरेखनाचे स्टँड लावणाऱ्या प्रदर्शकांचे आभार मानले. त्याचप्रमाणे आपल्या गृहोत्पादन उद्योगाच्या आरेखन क्षमतांना अधोरेखित करत या दिमाखदार कार्यक्रमाची माहिती देताना अतुल शहा म्हणाले:

"HGH India चे स्वरूप आणि संस्कृती आरेखन, गुणवत्ता आणि संस्थेच्या बाबतीत उच्च आंतरराष्ट्रीय मानकांशी मिळतीजुळती आहे". प्रमुख पाहुणे डॉ. अलेसॅन्ड्रो लिबेरॅटोरी यांनी निदर्शनास आणून दिले की प्रगत इटालियन गृहोत्पादन उद्योग HGH India सोबत दीर्घकालीन भागीदारी शोधत आहे, कारण HGH इटालियन कंपन्यांसाठी साजेसे वातावरण उपलब्ध करून देते, ज्यामुळे जटिल आणि मोठ्या भारतीय बाजारपेठेतील पहिली पायरी मोठ्या प्रमाणात सुलभ होते. "इटालियन आणि भारतीय गृहोत्पादन उद्योगांमधील सहकार्याचा विस्तार करणे हे इटालियन ट्रेड एजन्सीचे लक्ष्य आहे". HGH India च्या डिसेंबर 2022 आवृत्तीमुळे एकीकडे 400 प्रदर्शक आणि ब्रँड आणि दुसरीकडे 550 हून अधिक शहरांमधील खरेदीदार आणि स्पेसिफायर यांच्यात बैठका सुरू होतील.

# भारतातील इटालियन गृह उत्पादनं

इटालियन ट्रेड एजन्सी (I T A ) ने एचजीएच इंडिया वसंत २०२२ मध्ये संयुक्त दालन तयार केले, ज्यामध्ये ९ इटालियन कंपन्यांनी त्यांची उत्पादनं आणि सेवा सादर केल्या:

झनेट्टी मुरानो सर्ल यांचा हस्तनिर्मित भक्कम काचेच्या कलाशिल्प निर्मितीत हातखंडा आहे. वास्तूशिल्प विषयांत समाविष्ट: पक्षी, मासे, घोडे आणि अन्य प्राणी, अमूर्त देखील समाविष्ट त्याचप्रमाणे देवाधिदेव श्रीगणेश या श्रेणीचा भाग आहे. कलाकृतीच्या प्रत्येक भागावर कलाकाराच्या स्वाक्षरीचा ठसा असून “Vetro Artistico di Murano” अस्सल ट्रेडमार्क आहे, ज्याला अधिकृत इटालियन गव्हर्नमेंटच्या हमीचे पाठबळ असून उत्पादन अस्सल म्युरानो ग्लासचं आहे.

न्हाणीघर, शॉवर असलेला भाग आणि स्वयंपाक घरासारख्या ओलसर भागाला साजेशा आहेत. Li & Pra आदरातिथ्य आणि संस्थांमधील करार प्रकल्पांसाठी वैयक्तिक आवडीनुसार उत्पादन पर्याय देखील तयार करते. आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या वास्तुविशारदांच्या सहकार्याने तांत्रिक आणि शैलीत्मक दृष्टिकोनातून अनेक नाविन्यपूर्ण उत्पादन पर्याय शोधण्यात आले आहेत. उत्पादन निर्मिती इटली आणि स्वित्झर्लंडमध्ये करण्यात येते.

Brunel Preziosi D` Autore च्या वतीने विशेष भेटवस्तू आणि उंची फर्निचरसाठी आरेखित (डिझाईन) करण्यात आलेल्या कलात्मक चांदी आणि सोन्याच्या कलाकृती तयार करण्यात येतात. त्यांचा संग्रह त्यांच्या कार्यशाळेत पूर्णपणे हाताने तयार केलेला आहे. त्यात शिल्पांपासून ट्रे, फुलदाण्या, मेणबत्त्या, चहा/कॉफी सेट ते फर्निशिंग ॲक्सेसरीजपर्यंत विविध वस्तूंचा समावेश आहे. चांदी घडणावळीच्या प्राचीन कलेसारखे साहित्य, आरेखन आणि मॉडेलिंग प्रत्येक ब्रुनेल कलाकृतीला एक अद्वितीय उत्कृष्ट नमुना बनवते.

Seven Sedie Reproductions मध्ये नवीन तंत्रज्ञानासह हस्तकला बनवलेल्या परंपरेची सांगड घालण्यात आली आहे, ज्यात भारतात विविध प्रकारच्या शैलींसह खुर्च्यांची निवड केली जाते. शुद्ध कच्च्या स्वरूपातील चौकट (फ्रेम)पासून ते कापड वापरून तयार करण्यात आलेल्या सुबक खुर्चीपर्यंत. लाकूड कापण्यापासून ते मुलामा चढविण्यापासून आणि सुकवण्यापर्यंत, शिलाईपासून ते तयार खुर्च्यांच्या पॅकेजिंगपर्यंत व्हॅल्यू चेनचे सर्व टप्पे थेट त्यांच्या स्वतःच्या कारखान्यात पार पाडले जातात, ज्यामुळे उच्च दर्जाचे उत्पादन सुलभ होते.

Casa K. blends periods and styles हे उत्तम प्रतीच्या साहित्याचे मिश्रण असून जीवनशैलीला वाट मोकळी करून देते. पारंपरिक फ्लोरेनटाईन टेक्निकल्स, सविस्तर माहितीकरिता प्रेम आणि अद्ययावत सुबकता अभिनव कलानिर्मिती करते.

Cesare Ferrari Group निवासी आणि व्यावसायिक सजावट प्रकल्पांसाठी विशिष्ट मागणीनुरूप फर्निचर, दरवाजे आणि सजावटीचे घटक पुरवतो. CFG च्या वतीने वास्तुविशारद आणि डिझायनरना व्यावसायिक सेवा पुरविण्यात येते, अस्सल इटालियन फर्निचर निर्माता परंपरेला अत्याधुनिक तंत्रज्ञानासह जोडण्यात येते. CFG विविध प्रकारच्या साहित्यासह कार्य करते, ज्यामध्ये इतर 3D आणि कंपोझीट विनियर, काच, धातू, नक्षीदार चामडे, ग्रेडियंट लॅक्केरिंग, धातूच्या जाळ्या आणि नैसर्गिक दगडांचा समावेश आहे.

Grassi Pietre कोणत्याही प्रकारच्या संगमरवर आणि दगडांवर काम करते, शक्यतो ज्यामध्ये विविध सामग्रीचा वापर केला जातो, अशा जटिल प्रकल्पांमध्ये.

LYM ही नव्या दमाची कंपनी असून तांत्रिक तसेच डिझाईन लायटनिंगमध्ये सर्वोत्तम असून तिची निर्मिती पूर्णपणे इटालियन आहे.

Status च्या वतीने वैशिष्ट्यपूर्ण फर्निचर स्टाईल देऊ करण्यात येते, जे आंतरराष्ट्रीय स्तरावर यशस्वी आहे.








*प्रमुख पाहुणे डॉ. अलेसॅन्ड्रो लिबेरॅटोरी आणि मान्यवर अतिथी अतुल शहा यांनी HGH India च्या अनेक दालनांत खास माहिती फेरी पूर्ण केली.*

# HGH India मधील झोपेचं विश्व

रात्रीची शांत चांगली झोप ही आपल्यासाठी ताजेतवाने होण्यासाठी अत्यंत आवश्यक असते. आरोग्यदायी झोप ही जीवनशैलीचा कल कळण्याच्या दृष्टीने विकसित होत असते. असे असले तरीही, शांत झोपेसाठी झोपण्यासाठी आवश्यक अशा उत्पादनांची आवश्यकता असल्याने यासाठी रिटेल, वितरण आणि पलंग, गाद्या, आणि होम टेक्स्टाईल उत्पादकंच्या मदतीची गरज असते. अशा प्रकारची उत्पादने ही आधुनिक किंवा फॅशनेबल नसली तरीही ग्राहकांचा विचार करता त्यांना याबाबतची माहिती आणि ज्ञान असणे आवश्यक असते.

जेव्हा आपण आरोग्याचा विचार करतो तेव्हा आहार आणि व्यायामापेक्षा झोप जास्त महत्त्वाची असते, हे तुम्हाला माहीत आहे का? फिलिप्स-केजेटी समुहाने केलेल्या एका वार्षिक सर्वेक्षणातून हा निष्कर्ष काढण्यात आला आहे. जरी गाद्या आणि इतर झोपेच्या उत्पादनांच्या गुणवत्तेचे तंत्रज्ञान झपाट्याने प्रगत होत असले आणि आपल्या शारीरिक गरजा आणि वैयक्तिक प्राधान्यक्रमानुसार आपण त्यांची निवड करू शकत असलो तरीसुद्धा, अनेक लोक आपण कुठे आणि कसे झोपतो याबाबत निष्काळजी असतात.

द इंडियन स्लीप प्रॉडक्ट्स फेडरेशन (आयएसपीएफ) ने HGH INDIA च्या सोबतीने संयुक्तरीत्या वर्ल्ड ऑफ स्लीप पॅव्हेलियॉंची संकल्पना प्रत्यक्षात उतरवली आहे. या माध्यमातून ते अत्याधुनिक तंत्रज्ञान सादर करत आहेत आणि वैयक्तिक मागणीच्या मूलभूत गोष्टींची माहिती रिटेलर्सपर्यंत पोहोचवत आहेत. उत्पादने विकण्यापूर्वी झोप विका (सेल स्लीप बिफोर यु सेल अ प्रॉडक्ट) हे या सादरीकरणाचे ब्रीदवाक्य आहे. उत्पादनांचे फायदे अधोरेखित करण्यापूर्वी तुम्हाला ग्राहकांच्या झोपेविषयीच्या तक्रारी समजून घेणे आवश्यक असते. वर्ल्ड ऑफ स्लीप पॅव्हेलियनमधील प्रदर्शनादरम्यान घेतल्या जाणाऱ्या व्याख्यानांमधून या विचारसरणीला चालना दिली जात आहे आणि ग्राहकांच्या ठराविक समस्या आणि त्याचे समाधानकारक निराकरण याबाबत त्यांना माहिती देऊन आरोग्यदायी झोप विकण्यासाठी रिटेलरना मदत केली जात आहे.




स्लीपवेल, कर्ल-ऑन, सेंच्युरी फायबर, फेमस फोम, स्प्रिंगफीट, स्लीपफ्रेश, आरडीपी फोम, रीपोझ मॅट्रेस आणि मॅट्रेस कंपन्या त्यांची उत्पादने ज्या ठिकाणी सादर करत आहेत, त्या जागेत मध्यभागी वर्ल्ड ऑफ स्लीप पॅव्हेलियन उभारण्यात आले आहे. आपण आपले एक तृतीयांश आयष्यु मॅट्रेसवर घालवत असल्याने योग्य मॅट्रेसच्या शोधात असलेल्यांसाठी या कंपन्या त्यांच्याकडील उपाययोजनांनी ग्राहकांना मदत करत आहेत.

## Smart Kitchen
an initiative by HGH India

HGH India मध्ये स्वयंपाकघर म्हणजेच किचनचा विचार करण्यात आला आहे. वंडरशेफ किंवा संजीव कपूरसारखे बाजारातील अग्रेसर ब्रँड डिझाईन, प्रगत कार्यक्षमता, स्वयंपाक करण्यातील सोयी-सुविधा आणि किचन व्यवस्थापन इ. मधील नाविन्यपूर्ण गोष्टींचे सादरीकरण करत आहेत. भारतीय स्वयंपाकघरं अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि सुविधांचा अवलंब करत आहेत. अनेक भारतीय कुटुंबांमधील किचन्स स्मार्ट होत आहेत. हा कल ओळखून कूकवेअर आणि किचनवेअर उत्पादक अतिशय सुयोग्य उपाययोजना घेऊन येत आहेत.

अन्न साठवणूक, तयारी, प्रक्रिया, सर्व्हिंग आणि डिशवॉशिंगच्या सर्वच टप्प्यांवर स्वच्छता आणि आरोग्य सुरक्षेबाबतच्या नव्या मागण्या नाविन्यपूर्ण गोष्टींना चालना देत आहेत.

खरेदीदारांना हॉल 3 मध्ये हेल्थ सेफ कोटिंग असणारी कूकवेअर आणि अशाच प्रकारच्या अनेक नवीन सोयी-सुविधा बघता येऊ शकतात आणि त्यांची समीक्षा करता येऊ शकते.




## Kids' Home
an initiative by HGH India

भारतातील किड्स होम उत्पादन बाजाराचा विस्तार वाढत आहे आणि पालक दर्जेदार गुणवत्तेची आणि ब्रँडची अपेक्षा करत असल्याने हा बाजार आणखी विस्तारत आहे आणि नवीन संधी देऊ करत आहेत. नाविन्यपूर्ण, उत्कृष्ट डिझाईन असलेल्या आणि दर्जेदार उत्पादनांच्या मागणीत दरवर्षी सुमारे 15 टक्क्यांनी वाढ होत आहे. HGH INDIA ने त्यांच्या डिसेंबर आवृत्तीमध्ये एक विशेष विभाग ठेवला आहे. यात बेबी ब्लँकेट, बेबी बेडिंग, किड्स मॅट्रेस, वॉकर्स, कटलरी, टेबलवेअर, किड्स स्टोअरेज, शैक्षणिक खेळणी आणि इतरही अनेक वस्तूंच्या विस्तृत श्रेणींचे प्रदर्शन मांडले जाईल.




प्लूचीतर्फे विणलेल्या सॉफ्ट टॉईजची अतिशय कल्पक श्रेणी, बेबी आणि किड्स बेडिंग, बेबी टॉवेल, ॲक्सेसरीज, कम्फर्टर्स, गिफ्ट सेट्स इ. वस्तू मांडल्या जातील. ते त्यांच्या डिस्ने/मार्वल/स्टारवॉर्स परवानामान्य बेबीज आणि किड्स प्रॉडक्ट्सही प्रदर्शनात ठेवणार आहेत. हॅपी होम लिनन्सतर्फे किड्स बेड लिनन, शोड कुशन्स, शॉवर कर्टन, उशा, क्विल्ट प्रदर्शनात मांडण्यात येतील. सेंच्युरी मॅट्रेसही वैशिष्ट्यपूर्ण किड्स मॅट्रेस कलेक्शन घेऊन येणार आहे. बुन अँड डॉक्टर टॉवलतर्फे त्यांचे किड्स टॉवल लिनन सादर केले जातील. श्रद्धा टेरी या भारतातील एका उत्कृष्ट टॉवल उत्पादकातर्फे त्यांच्या मायक्रो कॉटन ब्रँडअंतर्गत बाळांसाठी बेडशीट आणि टॉवलचा शुभारंभ केला जाईल. हाताने तयार केलेल्या लाकडी खेळण्यांच्या उत्पादकांसाठी, किड्स फर्निचर आणि इतर किड्स आणि बेबी प्रॉडक्ट्ससाठी ईपीसीएचने गट सहभागाचे आयोजन केले आहे. इतर अनेक नियमित प्रदर्शनकर्तेही त्यांची वैशिष्ट्यपूर्ण किड्स श्रेणी प्रदर्शनात मांडणार आहेत.



**ह्युसेन आयडीन**
कॉन्स्युलेट जनरल ऑफ टर्की

HGH India ला ही तिसरी किंवा चौथी भेट आहे आणि दरवर्षी हे प्रदर्शन अपेक्षांच्या पलीकडे विस्तारत असल्याचे आम्हाला दिसून आले आहे. या प्रदर्शनाचे आयोजन अतिशय सुयोग्यरीत्या आणि जागतिक पातळीवर केले जात असल्याने प्रदर्शनकर्त्यांना त्यांच्या ब्रँडना चालना देण्याची मोठी संधी उपलब्ध होते. HGH India मध्ये सहभागी होण्यासाठी आम्ही अनेक अधिकाधिक टर्किश कंपन्यांना प्रोत्साहन देत आहोत आणि तशी अपेक्षा करत आहोत. आम्ही याची मनापासून शिफारस करत आहोत.



**प्रतिमा लादीवाला**
को-फाउंडर अँड डायरेक्टर,
प्लूची

ज्या ठिकाणी आम्ही एक ब्रँड म्हणून प्रदर्शनात सहभागी व्हायला सुरुवात केली तो HGH India हा आमचा सर्वात पहिला मंच आहे. गेल्या 5 वर्षांपासून आम्ही HGH India च्या प्रदर्शनात सहभागी होत आहोत आणि प्रत्येक वेळी बूथ अधिकाधिक विस्तारत आणि उत्कृष्ट होत आहे. भारतभरातून आलेल्या रिटेलर्सना भेटणे हा एक जबरदस्त अनुभव आहे. 50% रिटेलर्स हे आमच्यासाठी वारंवारचे खरेदीदार असतात. त्यांना पुन्हा एकदा प्रत्यक्षात भेटणे अतिशय सुखावह असते. आमच्या उत्पादनांबाबतची त्यांची प्रतिक्रिया जाणून घेऊन त्यात सुधारणा करण्याची संधी आम्हाला मिळते.



**एस. के. मल्होत्रा**
डायरेक्टर (अध्यक्ष)
सेल्स अँड मार्केटिंग, स्प्रिंगफीट

गेल्या अनेक वर्षांपासून आम्ही HGH India मध्ये सहभागी होत आहोत. खरे सांगायचे झाले तर HGH च्या सुरुवातीपासूनच आम्ही त्यांच्यासोबत आहोत. आमच्या उत्पादनांसाठी हा एक योग्य मंच आहे. आम्ही आमच्या नव्या उत्पादनांचा शुभारंभ याच ठिकाणी करतो. आमचे खरेदीदार इथे येऊन आमच्या उत्पादनांचा अनुभव घेऊ शकतात. आम्ही 50-60 चौ. फूट जागा असलेल्या एका छोट्या बूथपासून सुरुवात केली होती. आता आमचा बूथ 250 चौ. फुटाचा असतो. आम्ही ग्रेटर नॉयडातील प्रदर्शनातही सहभागी झालो होतो. या गोष्टींला केवळ सहाच महिने झाले आहेत. तरीही तशाच प्रकारचा प्रतिसाद बघून आम्ही भारावून गेलो आहोत.



**अभिनव महाजन**
एमडी, मास्पर

या प्रदर्शनाच्या अगदी सुरवातीपासून मास्पर लिव्हिंग HGH India सोबत आहे. आम्ही वर्षातील ४ दिवस नक्की इथे असतोच. स्थान महत्त्वाचे असते यावर आमचा विश्वास आहे. आम्ही गेली 22 वर्षे या व्यवसायात आहोत. आम्ही यावर्षी रिटेलर्ससाठी शॉप-इन-शॉप संकल्पनेचा शुभारंभ केला आहे आणि हेच यावर्षीचे वैशिष्ट्य आहे. खरेदी करण्यापूर्वी ग्राहकांना उत्पादनाचा अनुभव घेता येईल. आम्ही कलर ट्रेंड आणि संकल्पनांचा अर्थ लावण्यासाठी 1 8 महिने आधीपासूनच कामाला लागतो.



**अपूर्व कुमार**
असिस्टंट व्हीपी (सहाय्यक उपाध्यक्ष)
इंडिया प्रॉडक्ट सोर्सिंग,
वंडरशेफ

आम्ही गेल्या ३ वर्षांपासून HGH India मध्ये सहभागी होत आहोत आणि दरवर्षी आम्हाला नवीन गोष्टी अनुभवायला मिळतात. जगभरातील अनेक ब्रँड इथे बघायला मिळत असल्याने हे भारतातील एक सर्वात मोठे व्यवसाय प्रदर्शन ठरत आहे. आम्हाला एक ब्रँड म्हणून आणि ज्या मूल्यांसाठी आम्ही काम करत आहोत त्या दृष्टीने आमची ओळख पटवून देण्यासाठी HGH नेहमीच आमच्या धोरण मंडळात सहभागी आहे. समविचारी लोक या प्रदर्शनात एकत्र येत असल्याने इथे ठराविक लोकांचीच गर्दी असते. या मंडळींना खरोखरच इतरांशी संवाद साधायचा असतो आणि आपला व्यवसाय विस्तारायचा असतो. अतिशय छोट्या बूथपासून आज एका मोठ्या बूथपर्यंत आम्ही प्रगती केली आहे.

HGH India च्या या मंचावर मला माझी कला दाखवण्याची संधी मिळाली. या ठिकाणी ही माझी पहिलीच वेळ आहे. आमची कला लोकप्रिय करण्यासाठी आणि शक्य असल्यास भविष्यात प्रशिक्षण देण्यासाठी मला अशा अनेक मंचांची गरज भासणार आहे. माझी कला दीर्घकाळ जिवंत राहावी अशी माझी इच्छा आहे.

**राजेन्द्र अंकम**
इंडिया हेरीटेज पॅव्हेलियनमधील कलाकार

## पहिल्या दिवसाचे फोटो













